
## श्रद्धेय सीतारामअप्पा बाबारामअप्पा एकलारे स्मृतिग्रंथ



# आधारवड

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani



# आधारवड

श्रद्धेय सीतारामअप्पा बाबारामअप्पा
एकलारे स्मृतिग्रंथ

प्रथम आवृत्ती : २५/०८/२०२२
ISBN 978-93-82995-67-8
© : Shri. Pramod Sitaramappa Eklare

* संपादक
श्री संतोष आप्पाराव एकलारे

* संपादक मंडळ
श्री अमृतराज भुजंगराव कदम
श्री गोविंदराव साहेबराव कदम
श्री प्रमोद सीतारामअप्पा एकलारे

* कार्यकारी संपादक
डॉ. रवि धोंडीराज बरडे

* मार्गदर्शक
श्री गुरू डॉ. नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज
श्री उत्तमराव दाजीसाहेब कदम
डॉ. दत्तात्रय रामचंद्र वाघमारे
श्री साहेबराव मारोतराव कदम
श्री श्रीनिवास रामनाथ काबरा
मा. प्राचार्य मनोहर माधवराव सोनटक्के
डॉ. विनय दत्तात्रय वाघमारे
श्री सुर्यकांत उत्तमराव कदम
श्री नितिन श्रीनिवास काबरा
प्राचार्य डॉ. के. राजकुमार

* संपादन सहाय्य
डॉ. शिवसांब कापसे
श्री अरूण डुब्बेवार
श्री गिरीष डावरे
डॉ. सोमनाथ गुंजकर

* प्रकाशक
अनुराधा पब्लीकेशन्स,
सिडको, नांदेड

* मुद्रक
बालाजी ग्राफिक्स, परभणी
मो. ७०५८२४०६००

३०. **साधी राहणी उच्च विचार**

– डॉ. संतोष बाबुराव कुन्हे / ५३

३१. **सीतारामअप्पा एकलारे दानशूरतेचा कळस ...**

– प्रा. ई.आर. मठवाले / ५४

३२. **अविस्मरणीय अण्णा**

– प्रा. ब.सु.कानडे / ६०

३३. **मी पाहिलेला देवमाणूस**

– डॉ. भुताळे पि.व्ही. / ६१

३४. **मी अनुभवलेले अण्णा ...**

– श्री अरूण डुब्बेवार / ६६

३५. **श्री गुरू बुद्धिस्वामी परिवाराचा आधारस्तंभ कोसळला ...**

– डॉ. आदिनाथ इंगोले / ६७

३६. **मनाची श्रीमंती असणारे अण्णा ...**

– श्री बाळासाहेब कुलकर्णी / ६८

३७. **सर्वस्पर्शी समाजसेवेचा शिलेदार**

– डॉ. संतोष शिवराज चांडोळे / ७०

३८. **प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व**

– डॉ. शिवसांब कापसे / ७२

३९. **उत्तुंग व्यक्तिमत्वाचा सहवास**

– डॉ. सोमनाथ गुंजकर / ७३

४०. **सर्वांगिण विकासाचे महामेरू – अण्णा**

– डॉ. पुष्पा गंगासागर / ७६

४१. **येथे कर माझे जुळती ...**

– डॉ. संजय दळवी / ७७

४२. **माझ्या नजरेतील कर्मयोगी**

– डॉ. रवी बरडे / ७९

४३. **अप्पा आपण होतात ...**

– अश्विनी पांचाळ / ८३

४४. **विद्यार्थ्यांचे उर्जास्रोत अण्णा**

– नितीन [illegible] पुळे / [illegible]


Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

# येथे कर माझे जुळती !

**प्रा.डॉ. संजय दळवी**
उपप्राचार्य तथा विभागप्रमुख, वनस्पतीशास्त्र विभाग,
श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय, पूर्णा

बरोब्बर दोन वर्षांपूर्वी करोना नावाच्या विषाणूने जगभर प्रचंड धुमाकूळ घातला. त्याचाच एक जबरदस्त फटका आमच्या श्री गुरु बुध्दिस्वामी परिवाराला बसला. आमचा आधारवड कोसळला.

श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालयाच्या परिसरात सर्वांशी हसतमुख गप्पा मारणारे अण्णा, विद्यार्थ्यांच्या पाठीवर हात ठेवून 'पोरहो चांगला अभ्यास करा, काही अडचण असली तर मला सांगा', असे म्हणत कित्येक वेळ विद्यार्थ्यांमध्ये रममाण होणारे अण्णा, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नित्य नियमित चौकशी करणारे अण्णा, 'काही अडचण?' असे हसत विचारून सर्वांच्या अडचणी सोडवणारे अण्णा, बुद्धिस्वामी मठात पंगती चालू असताना सर्व व्यवस्था उभे राहून पाहणारे अण्णा, स्वतःच्या वडिलांच्या स्मरणात दरवर्षी हजारो लोकांना जेवू घालणारे अण्णा, या आणि अश्या कितीतरी स्वरूपात अण्णा आमच्या कायम स्मरणात आहेत.

श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालयात काम करत असताना कोणत्याही वेळी काहीही अडचण आली कि डोक्यात एकच गोष्ट यायची, अण्णा आहेत न पाठीशी, मग काय भीती. वास्तविक जीवनातील 'सुपरहिरो' म्हणण्यासाठी जे काही आवश्यक आहे ते सर्व अण्णांच्या ठायी होते. ते ज्या प्रकारे व्यावसायिक आणि वैयक्तिकरित्या गोष्टी व्यवस्थापित करत असत ते पाहून कोणीही मंत्रमुग्ध व्हायचा. कितीही बाका प्रसंग उद्भवला, तरी अण्णा शांत आणि संयम ठेवून योग्य तो मार्ग काढायचे. प्रेम घेण्यापेक्षा ते देण्यात परमानंद आहे, दुसऱ्यांसाठी करता येईल तेवढे करावे, वाटेतील दगड उचलावा, वेदना देणाऱ्या काट्यांना स्वतःच्या हातांनी दूर करावे, रडणाऱ्यांचे अश्रू पुसून त्यांना हसवावे, या सगळ्या गोष्टी अण्णांनी आम्हाला त्यांच्या वर्तनातून शिकवल्या.

भरपूर शेती, अनेक व्यवसाय असूनही अण्णा महाविद्यालयाला भरपूर वेळ द्यायचे. अण्णांचे दैनंदिन वेळापत्रक ठरलेले असायचे. सकाळी दुकानात काही वेळ घालवून मग शेतावर चक्कर, दुपारी महाविद्यालयात येऊन तेथील अडचणी दूर करायचे. अण्णा महाविद्यालयात आल्याशिवाय महाविद्यालया मधील कोणताच प्रश्न सुटत नसे.

आज श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालयाने जे वैभव प्राप्त केले आहे त्यात अण्णा यांचा फार मोठा वाटा आहे. कै. भुजंगराव कदम (दादा), डॉ. दत्तात्रेय वाघमारे, मा. उत्तमरावजी कदम, मा. साहेबरावजी कदम, मा. श्रीनिवासजी काबरा अशा दिग्गज व्यक्तींना सोबत घेऊन कसलाही वाद न उद्भवू देता अण्णांनी महाविद्यालयाचा डोलारा उभा केला. पूर्णपणे पारदर्शक आणि लोकशाही पद्धतीने कार्य करणारी अशी संस्था आजकाल कुठेच पाहायला मिळत नाही. विज्ञान शाखेला अनुदान मिळवून देण्यासाठी



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Shri Guru Buddhiswami Shikshan ... Sanstha
Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.)
Estd.1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani